REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 10 | JULY - 2026

# महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक योगदानाचा आधुनिक युगात होणारा परिणाम : एक अभ्यास

कदम अरुणा दिगंबर
संशोधक

डॉ. सौ. एम.एम. वडवान
मार्गदर्शक
प्राचार्य एस.एस.ए कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर.

❖ **सारांश :-**



महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी एकोणिसाव्या शतकात केलेले शैक्षणिक कार्य आजच्या आधुनिक युगासाठी खूप महत्वाचे मार्गदर्शक ठरले आहे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे आणि समानतेचे सर्वात प्रभावी साधन आहे हे फुले दांम्पत्याने दाखवून दिले.

आजच्या युगातही फुले दांम्पत्याच्या शैक्षणिक कार्याचे महत्त्व अधोरेखित होते स्त्रीशिक्षणाचा दर वाढविणे, वंचित घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, आणि समाजातील सर्व घटकांना समतेची हमी देणे ही आव्हाने अजूनही पूर्णपणे सुटलेली नाहीत. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP २०२०) मध्ये समावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर दिला आहे. परंतु त्याची अंमलबजावणी करताना अनेक अडथळे येतात. या पार्श्वभूमीवर फुले दांपत्यांचे शैक्षणिक योगदान आजही प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरते.

❖ **प्रास्ताविक :-**

मानवी समाजाच्या इतिहासात शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवून सामाजिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या अनेक व्यक्ती आढळतात. समाजातील विषमता, अन्याय, अंधश्रध्दा व दडपशाही यांना आव्हान देण्यासाठी आणि लोकशाही, समता व बंधुता या मूल्यांचा पाया घालण्यासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन ठरते. शिक्षणामुळे केवळ वैयक्तिक विकास घडतो असे नव्हे , तर समाजाचे राजकीय आर्थिक आणि सांस्कृतिक रूपांतर होण्याची प्रक्रिया घडते. भारतीय समाजाचा विचार करता १९ व्या शतकातील शिक्षण क्षेत्र हा एका प्रकारच्या क्रांतिकारी चळवळीचा भाग होता कारण त्यावेळी

जातीव्यवस्था स्त्रीदास्य व अज्ञान यांचे गडद सावट होते. या सामाजिक परिस्थितीत महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाला केंद्रस्थानी ठेवून एक नवचैतन्य निर्माण केले.

फुले दांम्पत्यांनी उभारलेली शाळा (१८४८) ही केवळ एक शैक्षणिक संस्था नव्हती, तर ती एक प्रकारची सामाजिक क्रांतीची प्रयोगशाळा होती. त्यांनी मुलींना, दलितांना आणि इतर वंचितांना शिक्षण दिले जे त्या काळाच्या सामाजिक रचनेला थेट आव्हान होते. सावित्रीबाई फुले यांनी या शाळेत अध्यापन केले आणि त्यांना भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून ओळख मिळाली. त्यामुळे, शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी स्त्री-पुरुष समानता, जातिव्यवस्थेचे उच्चाटन आणि सामाजिक न्यायाचे तत्व रुजवले. (Omvedt, १९७६)

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश म्हणजे महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक योगदानाचा अभ्यास करून त्याचा आधुनिक युगावर होणारा परिणाम समजून घेणे हा आहे. या अभ्यासातून केवळ ऐतिहासिक संदर्भ स्पष्ट होणार नाहीत तर आधुनिक शिक्षणातील धोरणे उपक्रम आणि चळवळींना दिशा मिळेल.

## ❖ संशोधनाची उद्दिष्टे:-

१. महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.
२. महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करणे.
३. महात्मा जोतिबा फुले व सवित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याचा अभ्यास करणे.
४. महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे समाजातील मागास-वर्गीय घटकांच्या शिक्षणा संदर्भात केलेले कार्य अभ्यासणे.
५. महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्याचा उच्च प्राथमिक व माध्यमिक अभ्यासक्रमाध्ये असलेल्या पाठ्यांशाचा अभ्यास करणे.
६. महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक योगदानाचा आधुनिक युगातील शिक्षणामध्ये दिसणाऱ्या प्रभावाचा/परिणामांचा आढावा घेणे.

## ❖ संशोधनाची गरज :-

एकोणिसाव्या शतकात भारतात झालेल्या सामाजिक व शैक्षणिक क्रांतीमुळे आज भारताने जगाच्या पटलावर अभूतपूर्व प्रगती साधली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग अर्थव्यवस्था आणि शिक्षण या क्षेत्रांतील भारताची भरारी ही जगातील प्रत्येक राष्ट्रासाठी आदरणीय ठरत आहे. आज भारताला जागतिक स्तरावर एक सक्षम व विकसित देश म्हणून मान्यता मिळाली आहे. तथापि या प्रगतीच्या पायाभरणीमागे एकोणिसाव्या शतकात झालेली सामाजिक जागृती आणि शैक्षणिक परिवर्तन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आज भारताची जी प्रगती आपल्याला अनुभवता येते, ती मोठ्या प्रमाणात फुले दांम्पत्याच्या शैक्षणिक कार्यामुळेच शक्य झाली आहे. आधुनिक काळात स्त्री - पुरुष समानता, वंचित घटकांचे सक्षमीकरण, सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली करणे आणि समावेशक समाजरचना ही तत्वे मान्य झाली आहेत. त्यांची पायाभरणी यांच्या कार्यातून झाली. त्यामुळे, महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले

यांनी केलेल्या शैक्षणिक योगदानाचा आधुनिक युगातील शिक्षणावर व समाजरचनेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे ही संशोधनाची आजची प्रमुख गरज आहे.

शालेय स्तरावरही महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा अभ्यास अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केला गेला आहे. उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची ओळख करुन दिली जाते. या पाठ्यांश्याच्या अभ्यासामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, समानतेचे भान, स्त्री शिक्षणाचे महत्व आणि प्रगतिशील दृष्टीकोन विकसित होतो. त्यामुळे त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा शालेय अभ्यासक्रमातील प्रतिबिंब अभ्यासणे गरजेचे आहे.

## ❖ संशोधनाचे महत्व :-

फुले दांम्पत्यांने स्त्री शिक्षण आणि बहुजन शिक्षणाचा पाया रचला. आजच्या आधुनिक युगात जिथे सर्वसमावेशक शिक्षण ही जागतिक गरज बनली आहे. तिथे त्यांच्या मूळ विचारांचा आधुनिक शिक्षण पद्धतीवर नेमका काय आणि कसा परिणाम झाला आहे हे अभ्यासणे तर्कसंगत व कालसुसंगत ठरते. यातून आधुनिक शिक्षणाची वाटचाल योगय दिशेने होत आहे किंवा नाही याचे मुल्यमापन करण्यास मदत होते. सद्यस्थितीत उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अभ्यासाक्रमात फुले दांपत्याच्या जीवन कार्याचा समावेश कशा प्रकारे केला आहे, याचे वास्तव चित्र या संशोधनातून पुढे येईल. यातून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ आणि अभ्यासक्रम विकासकांना सद्यस्थितीत पाठ्यांश्याची परिणामकारकता समजेल व भविष्यात अभ्यासक्रमात कोणकोणते सुधारणात्मक बदल करणे आवश्यक आहे, यासाठी निश्चित दिशा मिळेल.

## ❖ संशोधन पद्धतीची निवड :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने संशोधन समस्या "महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक योगदानाचा आधुनिक युगात होणारा परिणाम : एक अभ्यास" या विषयाचा सखोल अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे.

यासाठी ‘ऐतिहासिक संशोधन’ पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा आधुनिक युगातील शिक्षण प्रणाली, शिक्षक, विद्यार्थी आणि अभ्यासक्रम यांवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी संशोधिकेने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीच्या उपप्रकारातील ‘शालेय सर्वेक्षण पद्धतीचा’ अवलंब केला आहे.

## ❖ संशोधन नमुना निवड

### १) तालुका निवड :-

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यांपैकी ११ म्हणजेच १०० टक्के तालुक्यांची निवड केली आहे. प्रस्तुत संशोधनात नमुना निवडीऐवजी ‘पूर्ण प्रगणना पद्धत’ वापरून संपूर्ण जिल्ह्याचा अभ्यास क्षेत्र म्हणून स्वीकार केला आहे.

२) **शाळेची निवड** :-

प्रस्तुत संशोधनासाठी सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या इयत्ता पाचवीचा वर्ग असणाऱ्या एकुण ९२७ प्राथामिक शाळांपैकी प्रत्येक तालुक्यातील दोन प्राथमिक शाळा अशा एकूण २२ शाळांची म्हणजे २ टक्के शाळांची निवड सुगम यादृश्चिक पद्धतीमधील लॉटरी पद्धतीने नमुना निवड करण्यात आली. तसेच एकूण ११ तालुक्यातील १०० टक्के अनुदानित माध्यमिक विद्यालय एकुण १०७६ शाळांपैकी प्रत्येक तालुक्यातील दोन माध्यमिक शाळा अशा एकूण २२ शाळांची म्हणजे २ टक्के शाळांची निवड सुगम याद्दच्छिक पध्दतीमधील लॉटरी पध्दतीने करण्यात आली.

३) **विद्यार्थ्यांची निवड** :-

नमुना निवडलेल्या ११ तालुक्यातील १०० टक्के अनुदानित मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांतील इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या आणि जिल्हा परिषदेच्या इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या एकुण ९९० विद्यार्थ्यांपैकी ६७ टक्के म्हणजेच ६६० विद्यार्थ्यांची निवड सुगम याद्दच्छिक पध्दतीमधील लॉटरी पध्दतीने केली आहे.

४) **शिक्षकांची निवड** :-

नमुना निवडलेल्या ११ तालुक्यातील अनुदानित मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांतील व जिल्हा परिषद शाळांतील एकुण ४४० शिक्षकांपैकी ५३ टक्के म्हणजेच २३५ शिक्षकांची निवड सुगम यादृच्छिक पध्दतीमधील लॉटरी पध्दतीने निवड केली आहे.

५) **मुख्याध्यापकांची निवड** :-

नमुना निवडलेल्या ११ तालुक्यातील अनुदानित मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांतील व जिल्हा परिषद शाळांतील एकुण ४४ मुख्याध्यापकांपैकी १०० टक्के म्हणजेच ४४ मुख्याध्यापकांची निवड सुगम याद्दच्छिक पध्दतीमधील लॉटरी पध्दतीने निवड केली आहे.

❖ **संशोधनासाठी साधने व तंत्राची निवड** :-

प्रस्तुत संशोधनासाठी विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापक यांच्याकडून माहिती संकलनासाठी प्रश्नावली या साधनाचा वापर केला गेला. तसेच अधिक माहितीसाठी मुलाखत सूचीचा वापर करण्यात आला.

❖ **संशोधनाची कार्यपद्धती** :-

प्रस्तुत संशोधनामध्ये निवडलेल्या ११ तालुक्यातील १०० टक्के अनुदानित मराठी माध्यमांच्या शाळांतील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या व जिल्हा परिषदेच्या इयत्ता पाचवीमध्ये शिकणाऱ्या विदयार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी, मुख्याध्यापकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीला अंतिम स्वरूप देऊन मुद्रित करण्यात आले. परदर्शी अभ्यास करून पथदर्शक अभ्यासातील त्रुटी व चुका दूर करून अंतिम प्रश्नावली तयार करून मार्गदर्शकांना दाखवली. प्रश्नावली अंतिम स्वरुप देऊन मुद्रित करण्यात आली.

प्रश्नावली वरील मार्गदर्शक सूचना देऊन शिक्षक, विद्यार्थी व मुख्याध्यापक यांना प्रत्यक्ष शाळेत भेट देऊन प्रतिसाद नोंदविला व माहिती संकलित केली.

## ❖ संशोधनाचे निष्कर्ष :-

**उद्दिष्ट क्र.१ महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा अभ्यास करणे.**

१. अभ्यासातील सर्व मुख्याध्यापकांनी त्यांच्या प्रशालांमध्ये रात्रशाळा वर्ग भरत नसल्याचे नमूद केले असून, फुले दांपत्यांनी सुरू केलेल्या प्रौढ शिक्षण संकल्पनेचा शालेय स्तरावर मर्यादित अवलंब दिसून येतो.
२. सर्व मुख्याध्यापकांनी प्रौढ साक्षरता वर्ग घेतले जात नसल्याचे नमूद केले असून, प्रौढ शिक्षण क्षेत्रात शाळांची भूमिका कमी झाल्याचे दिसून येते.
३. बहुसंख्य शाळांमध्ये वसतीगृह सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक अडथळे अद्याप अस्तित्वात असल्याचे दिसून येते.
४. बहुतांश शाळांमध्ये तंत्रशिक्षण, कृषीशिक्षण व संगणक शिक्षणाची सुविधा उपलब्ध असून आधुनिक शिक्षण संकल्पना स्वीकारल्या जात असल्याचे दिसून येते.
५. शिक्षकांच्या मते महात्मा फुले यांचे कार्य मुख्यत्वे शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित असून त्याचे परिणाम सामाजिक परिवर्तनावरही झाले आहेत.

**उद्दिष्ट क्र.२ महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करणे.**

१. महात्मा फुले यांच्या वैचारिक जडणघडणीवर सर थॉमस पेन यांचा प्रभाव पडल्याचे ४९.७८% शिक्षकांनी नमूद केले आहे.
२. थॉमस पेन यांच्या Rights of Man या ग्रंथाचा महात्मा फुले यांच्या विचारसरणीवर प्रभाव पडल्याचे ६९.३६% शिक्षकांनी मान्य केले आहे.
३. महात्मा जोतिबा फुले यांची आर्थिक परिस्थिती बेताची होती असे ७१.८०% शिक्षकांनी नमूद केले आहे.
४. फुले दांपत्याला सामाजिक कार्यामुळे कौटुंबिक विरोध सहन करावा लागला होता असे ८८.९४% शिक्षकांचे मत आहे.
५. फुले दांपत्याच्या कौटुंबिक जीवनातून समता, त्याग, सहकार्य व सामाजिक बांधिलकी ही मूल्ये विकसित होतात असे ६५.९६% शिक्षकांनी नमूद केले आहे.

**उद्दिष्ट क्र .३ महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याचा अभ्यास करणे.**

१. विद्यार्थ्यांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबाबत जागरूकता समाधानकारक प्रमाणात आढळून येते.
२. १८४८ मध्ये भिडे वाड्यात सुरू झालेली पहिली मुलींची शाळा भारतीय स्त्री शिक्षणाच्या इतिहासातील क्रांतिकारक घटना ठरली.

३. सावित्रीबाई फुले यांनी भारतातील पहिल्या महिला शिक्षिका म्हणून स्त्री शिक्षण चळवळीला दिशा दिली.
४. फुले दांपत्याने सर्व जाती-धर्मातील मुलींना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून दिली.
५. स्त्री शिक्षणासाठी सामाजिक विरोध, बहिष्कार व अपमान सहन करूनही फुले दांपत्याने कार्य अखंड सुरू ठेवले.

**उद्दिष्ट क्र.४ महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे समाजातील मागासवर्गीय घटकांच्या शिक्षणा संदर्भात केलेले कार्य अभ्यासणे**.

१. शासनमान्य विविध शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबविल्या जातात, असे १००% मुख्याध्यापकांनी नमूद केले आहे.
२. ७५% मुख्याध्यापकांच्या मते सावित्रीबाई फुले व शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना मागासवर्गीय व मुलींच्या शिक्षणासाठी प्रेरणादायी ठरतात.
३. ६०% मुख्याध्यापकांच्या मते गुणवत्ता शिष्यवृत्ती व उपस्थिती भत्ता विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता व शिस्त निर्माण करतात.
४. ५२% मुख्याध्यापकांच्या मते अपंग शिष्यवृत्ती व EBC योजना शिक्षण अधिक सर्वसमावेशक बनवितात.
५. महात्मा फुले यांचा 'गुलामगिरी' हा ग्रंथ असल्याची माहिती १००% शिक्षकांना आहे, यावरून त्यांच्या सामाजिक विचारांविषयी स्पष्ट जागरूकता दिसून येते.

**उद्दिष्ट क्र.५ महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन व कार्याचा उच्च प्राथमिक व माध्यमिक अभ्यासक्रमामध्ये असलेल्या पाठ्यांशाचा अभ्यास करणे**.

१. सावित्रीबाई फुले यांच्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहाची माहिती ६०.४३% शिक्षकांना आहे, तर 'बावनकशी सुबोध रत्नाकर' विषयी तुलनेने कमी माहिती आढळते.
२. महात्मा फुले यांच्या कार्यावरील पाठांमुळे सामाजिक समता, न्यायभावना व मानवी मूल्ये विकसित होतात, असे ८८.०९% शिक्षकांचे मत आहे.
३. फुले यांच्या कार्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचे महत्त्व, आत्मसन्मान व आत्मविश्वास वाढतो, असे ८२.५५% शिक्षकांनी नमूद केले आहे.
४. स्त्री-पुरुष समानता व स्त्री सशक्तीकरणाची जाणीव ७९.१५% शिक्षकांच्या मते अभ्यासक्रमातून विकसित होते.
५. वैज्ञानिक दृष्टिकोन व अंधश्रद्धा निर्मूलनाची मूल्ये ७४.४७% शिक्षकांच्या मते पाठ्यघटकांतून विकसित होतात.
६. अभ्यासक्रमातील फुले दाम्पत्यांवरील पाठ्यघटक विद्यार्थ्यांच्या मूल्यविकासासाठी उपयुक्त ठरतात.
७. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमात फुले दाम्पत्यांचे कार्य समाविष्ट केल्यास सामाजिक समता व सुधारक विचारसरणी विकसित होण्यास मदत होते, असे १००% शिक्षकांनी नमूद केले आहे.

८. वाचन, चर्चा, क्षेत्रभेटी व कार्यशाळा यांसारख्या उपक्रमांमधून फुले दाम्पत्यांचे कार्य अधिक प्रभावीपणे पोहोचते, असे ६१.९०% शिक्षकांचे मत आहे.

**उद्दिष्ट क्र.६महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक योगदानाचा आधुनिक युगातील शिक्षणामध्ये दिसणाऱ्या प्रभावाचा/ परिणामांचा आढावा घेणे**. (**विद्यार्थी प्रश्नावलीवरून**)

१. शिक्षक म्हणून फुले दाम्पत्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे १००% शिक्षकांनी मान्य केले आहे.
२. स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक सामान्यज्ञान व इतिहासाची भक्कम पायाभरणी फुले यांच्या कार्याच्या अभ्यासातून होते असे ८१.७०% शिक्षकांचे मत आहे.
३. विद्यार्थ्यांमध्ये मानवतावादी दृष्टिकोन विकसित होतो असे ७३% शिक्षकांनी नमूद केले आहे.
४. वैज्ञानिक दृष्टिकोन व विवेकवादी विचारसरणी विकसित होण्यास फुले विचार उपयुक्त ठरतात असे ७३% शिक्षकांनी मत व्यक्त केले आहे.
५. शाळांमध्ये स्वच्छता अभियानास ८८% आणि वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धनास ८२% मुख्याध्यापक प्रोत्साहन देतात, यावरून सामाजिक शिक्षणाची संकल्पना फुले विचारांशी सुसंगत असल्याचे दिसते.
६. एकूणच, प्रस्तुत संशोधनातून असे निष्पन्न होते की, महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक विचारांचा प्रभाव आधुनिक शिक्षणातील सर्वसमावेशकता, स्त्री शिक्षण, सामाजिक समता, मूल्यशिक्षण, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, स्पर्धा परीक्षा तयारी आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये व्यापक स्वरूपात आजही जाणवतो.

## ❖ शिफारशी

- **विद्यार्थ्यांसाठी शिफारशी** :-

१. विद्यार्थ्यांनी महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा अभ्यास केवळ पाठ्यपुस्तकापुरता मर्यादित न ठेवता त्यांच्या चरित्रग्रंथ साहित्य व सामाजिक कार्याचा स्वतंत्रपणे अभ्यास करावा.
२. विद्यार्थ्यांनी स्त्री-पुरुष समानता, सामाजिक समता, मानवता व वैज्ञानिक दृष्टिकोन ही मूल्ये आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारण्याचा प्रयत्न करावा.
३. विद्यार्थ्यांनी शासकीय शिष्यवृत्ती, मोफत शैक्षणिक सुविधा व विविध शैक्षणिक योजनांचा लाभ घेऊन शिक्षणातील सातत्य टिकवून ठेवावे.

- **शिक्षकांसाठी शिफारशी** :-

१. शिक्षकांनी महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक, सामाजिक व मानवतावादी विचारांचा अध्यापन प्रक्रियेमध्ये नियमितपणे समावेश करून विद्यार्थ्यांमध्ये समता, सामाजिक न्याय व वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रयत्न करावेत.
२. शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील मर्यादित माहितीवर अवलंबून न राहता फुले दाम्पत्यांच्या जीवनकार्याशी संबंधित अतिरिक्त संदर्भसाहित्य, चरित्रग्रंथ व साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावे.

३. शिक्षकांनी स्त्री शिक्षण, लिंगसमता, सामाजिक समता व वंचित घटकांचे शिक्षण या विषयांवर आधारित कृतीप्रधान अध्यापन, चर्चासत्रे, प्रकल्प व उपक्रम आयोजित करावेत.

- **अभ्यासक्रम निर्माते / पाठ्यपुस्तक मंडळासाठी शिफारशी** :-

१. प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन, कार्य, साहित्य व शैक्षणिक विचारांचा अधिक सविस्तर व स्वतंत्र स्वरूपात समावेश करावा.

२. पाठ्यपुस्तकांमध्ये स्त्री शिक्षण, सामाजिक समता, वंचितांचे शिक्षण, मानवता व वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांशी संबंधित कृतीआधारित अध्ययनघटकांचा समावेश करावा.

३. महात्मा फुले यांचे गुलामगिरी, शेतकऱ्याचा असूड तसेच सावित्रीबाई फुले यांचे काव्यफुले यांसारख्या साहित्यकृतींचे निवडक उतारे पाठ्यपुस्तकांमध्ये समाविष्ट करावेत.

- **शासनासाठी शिफारशी** :

१. शासनाने महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणविषयक विचारांच्या अनुषंगाने रात्रशाळा, प्रौढ साक्षरता वर्ग व पर्यायी शिक्षण केंद्रे पुन्हा प्रभावीपणे सुरू करण्यासाठी स्वतंत्र धोरण व निधी उपलब्ध करून द्यावा.

२. ग्रामीण, दुर्गम व मागास भागातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, वाहतूक सुविधा व निवासी शैक्षणिक संकुले वाढविण्यास प्राधान्य द्यावे, जेणेकरून शिक्षणातील गळती कमी होण्यास मदत होईल.

३. मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सायकल योजना, मोफत सॅनिटरी पॅड योजना, स्वतंत्र स्वच्छतागृह व सुरक्षित शालेय वातावरणाच्या सुविधा सर्व शाळांमध्ये प्रभावीपणे राबवाव्यात.

## ❖ समारोप :-

या संशोधनाचा उद्देश महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक योगदानाचा आधुनिक युगातील शैक्षणिक व्यवस्थेवर होणारा परिणाम यांचा सखोल अभ्यास करणे हा होता. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, फुले दांपत्याने मांडलेली शिक्षणविषयक तत्त्वे आजही तितकीच समर्पक, मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहेत.

संशोधनातून असे आढळून आले की, स्त्रीशिक्षण, सर्वांसाठी शिक्षण, समता, सामाजिक न्याय आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांचा आधुनिक शिक्षणव्यवस्थेवर खोलवर प्रभाव पडलेला आहे. आजच्या काळातील सर्वसमावेशक शिक्षण, मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य, दुर्बल व वंचित घटकांसाठी शैक्षणिक योजना तसेच समान शैक्षणिक संधी या बाबी फुले दांपत्याच्या विचारांशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

शेवटी, हे संशोधन असे स्पष्ट करते की, महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान केवळ ऐतिहासिक महत्त्वाचे नसून, आधुनिक युगातील शैक्षणिक सुधारणांसाठीही ते दिशादर्शक आहे. त्यांच्या विचारांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास शिक्षण व्यवस्था अधिक समताधिष्ठित, लोकाभिमुख व समाजपरिवर्तन घडवणारी ठरेल आणि त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होईल.

## ❖ संदर्भ ग्रंथ :-

१. अकोलकर, ग. वि. (१९७३). शैक्षणिक तत्वज्ञानाची रूपरेखा. पुणेः श्री विद्या प्रकाशन.
२. कऱ्हाडे, बी. एम. (२००७). शास्त्रीय संशोधन पद्धती. नागपूरः पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स.
३. कांडगे, रा. (अ.क्र.). महात्मा ज्योतिराव फुले : व्यक्ती व कार्य.
४. कीर, ध. (१९६८). महात्मा ज्योतिराव फुले. मुंबईः पॉप्युलर प्रकाशन
५. नरके, ह. (संपा.). (२०१३). महात्मा फुले समग्र वाङ्मय. मुंबईः महात्मा ज्योतीराव ▪ चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन.
६. नरके, ह. (संपा.). (२०१८). महात्मा फुले समग्र वाङ्मय (२ री आवृत्ती). मुंबईः म जोतीराव फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन.

## ❖ Bibliography

१. Best, J. W. (2026). Research in education (9th ed.). Prentice Hall of India Private Limited.
२. Best, J. W., & West, J. W. (1959). Research in education. Prentice-Hall